देशोन्नती

# विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या काळजीपूर्वक वापराची घेतली शपथ

देशोन्नती वृत्तसंकलन...

**पारस** ■ येथील संत गजानन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राष्ट्रीय सायबर ही हवीशी सुरक्षा सप्ताहनिमित्त 'सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षेविषयी' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करण्याची शपथ घेतली.

ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व क्विक हिल फाउंडेशन, पुणे, महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ.जे.एम. साबू, अभियानाचे समन्वयक डॉ.एच.जे. खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. यामध्ये सायबर वॉरियर्स वैष्णवी बेलांगे व सलोनी जैस्वाल यांनी मार्गदर्शन केले.

## ▶▶ सायबर क्राइमबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



ऑनलाइन फसवणुकीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने संत गजानन इंग्लिश मीडियम स्कूलने हा उपक्रम आयोजित केला होता. या कार्यशाळेत विद्यार्थी शालेय जीवनात मोबाईलचा अतिवापर करतात, ऑनलाइन खरेदीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे त्या मधून जास्तीत जास्त फसवणुकीला आपण बळी पडतो.

त्यामुळे आपण जे वेगवेगळ्या प्रकारचे ऑनलाइन खरेदीचे ॲप्स वापरतो ते वापरताना काय काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यासोबतच व्हॉट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचाट, लाइव्ह लोकेशन आदी वापरताना आपल्याकडून खूप चुका होतात त्या न होऊ देता याचा काळजीपूर्वक वापर कसा करावा, याची शपथ घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक मनोज लांडे, सहायक शिक्षक निलेश सातव, सय्यद असलम, शिवाजी पंडितकर, राजेश दिवनाले, सूफियान अन्सारी, टिळक भारंबे, हेमंत उपरीकर, योगगुरू उमेश बांबाडकर, दीपाली दळी, जयमाला बोडखे, कल्याणी बकाल, शुभांगी लोड, वर्षा होनाळे, रविना लांडे, सायमा परवीन, प्रियंका हागे, संगीता गुलदेवकर, वर्षा सुरूशे, प्रिया चोपडे, रेखा भरणे, नीता टिकार, प्राची राऊत, करूणा खंडारे, ज्योती बोदले आदी उपस्थित होते.

### याबाबत दिली माहिती

सायबर गुन्हे कशाला म्हणतात, सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून ऑनलाइन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाइलमुळे होणारे फ्रॉड्स, फिशिंग, फोटोमोर्फिंग, अडेंटीटी थेप्ट, एटीएम, ऑनलाइन गेमिंगमुळे होणारे विद्यार्थ्यांचे नुकसान या विषयी सविस्तर माहिती कार्यशाळेतून देण्यात आली. तसेच टू-स्टेप व्हेरिफिकेशन, फायरवॉल आणि अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर करण्याचेही सांगितले.